MHKO110016272017

दाखल दिनांक - ०८/११/२०१७.
नोंद दिनांक - ०८/११/२०१७.
निकाल दिनांक - ०२/०७/२०२६.
कालावधी - वर्ष महीने दिवस
०८ ०७ २५

**पेठ-वडगांव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ-वडगांव**
( पीठासीन अधिकारी श्रीनिवास अ. कुलकर्णी )

**नियमित फौजदारी खटला क्र. २३३/२०१७.**
(CNR No.MHKO110016272017)
**निशाणी क्र. /**
[गुन्हा रजि. क्र.३६८/२०१६.
पेठ वडगांव पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर]

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन** तर्फे पोलीस ठाणे अधिकारी, वडगांव पोलीस ठाणे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| **अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ** | श्रीमती आर. एच. मोरे, सहा. सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | **१. सुभाष नामदेव शिंगे.**<br>व.व. २८, धंदा - काही नाही.<br><br>**२. संतोष नामदेव शिंगे.**<br>व.व. २५, धंदा - काही नाही.<br>दोघे रा. आडणी, ता. आथणी, जि. बेळगांव. |
| **आरोपीं तर्फे विधिज्ञ** | श्री. जे. ए. जाधव. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ०६/०५/२०१५. |
| प्रथम खबर | ०४/१२/२०१६. |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | ०८/११/२०१७. |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १८/०६/२०२४. |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | २५/०६/२०२६. |
| न्यायनिर्णय करिता ठेवलेली तारीख | ०२/०७/२०२६. |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय तारीख | ०२/०७/२०२६. |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | – |

## आरोपीविषयी माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामिनावर सुटलेची तारीख | आरोपीत गुन्हा | निर्दोष किंवा शिक्षा | ठोठाव ण्यात आलेली शिक्षा | खटल्या दरम्यान आरोपी बंदिवासात असल्याचा कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **सुभाष नामदेव शिंगे.** | - | - | भा.दं.सं. कलम ४०६, व ४२० सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष | - | - |
| २. | **संतोष नामदेव शिंगे.** | - | - | वरील प्रमाणे. | निर्दोष | - | - |

## अभियोग/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**(अ) अभियोग पक्षातर्फे साक्षीदार -**

| **अ.क्र.** | **साक्षीदारांचे नांव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १. | वसंत शंकर जाधव. | २१ | फिर्यादी. |

**(ब) बचाव पक्षातर्फे साक्षीदार - निरंक**

**(क) न्यायालय तर्फे साक्षीदार - निरंक**

## अभियोग/बचाव/न्यायालय निशाणी क्रमांक

**(अ) अभियोग पक्षातर्फे निशाणी -**

| **अ. क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | २२ | फिर्याद वरील फिर्यादी यांची स्वाक्षरी. |

**(ब) बचाव पक्षातर्फे निशाणी - निरंक**
**(क) न्यायालय पक्षातर्फे निशाणी - निरंक**
**(ड) भौतीक वस्तु - निरंक**

## न्यायनिर्णय.

( आज दिनांक ०२ जुलै, २०२६ रोजी घोषित )

आरोपीवर क्र.१ व २ यांच्यावर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४०६, व ४२० सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत दोषारोप आहे.

**अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे -**

०२. फिर्यादी वसंत शंकर जाधव हे मौजे मिणचे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील रहिवासी असून त्यांचा मातीच्या विटा तयार करण्याचा व्यवसाय आहे. यातील आरोपी क्र.१ व २ हे त्यांच्या विट भट्टीवर कामगार म्हणून काम करत होते. आरोपी यांनी फिर्यादीच्या विट भट्टीवर काम करण्यासाठी दिनांक ०६/०५/२०१५ रोजी रक्कम रू.१,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) स्वीकारले. तसेच, सदरची रक्कम स्विकारताना करारपत्रात ठरल्याप्रमाणे इतर मजूरांसोबत कामावर येण्याचे मान्य केले. मात्र, आरोपी हे ठरल्या करारप्रमाणे कामावर आले नाहीत. तसेच, त्यांना वारंवार संपर्क करून देखील त्यांनी कामावर येण्यास नकार दिला तसेच कारारापोटी स्विकारलेली रक्कम देखील परत करण्यास नकार दिला. त्यावरून, आरोपींनी फिर्यादी याची फसवणूक केली. सबब, फिर्यादी यांनी दिनांक ०५/०७/२०१६ रोजी वडगांव पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना सदरची बाब ही दिवाणी स्वरूपाची असल्यामुळे सदरची तक्रार स्वीकारण्यास नकार दिला. सबब, फिर्यादीने प्रस्तुत न्यायालयात तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवरून पेठवडगांव पोलीस ठाणे यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६(३) अन्वये तपास करण्याचे आदेश पारित करण्यात आले.

०३. सदर आदेशानुसार वडगांव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र.३६८/२०१६ असा नोंद झाला. गुन्ह्याचा तपास श्री. एस. बी. मेतके - पोलीस हेड कॉन्स्टेबल — २/६७३ यांचेकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी संबंधीत साक्षीदारांचे बयान नोंदवून

घेतले, तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुद्ध पुरेसा पुरावा मिळून आल्यामुळे त्यांनी आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र सादर केले.

०४. आरोपी हजर झाल्यावरून **निशाणी क्र.०९** वर आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांच्यावर भारतीय दंड संहिता कलम ४०६ व ४२० सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला. सदर दोषारोप आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपींनी त्याच्यावरील आरोप नाकारून खटल्याची संपरिक्षा घेण्याची मागणी केली.

०५. अभियोग पक्षाने सदर प्रकरणात फिर्यादी साक्षीदार - वसंत शंकर जाधव यांची साक्ष **निशाणी क्र.२१** वर नोंदविण्यात आली आहे. अभियोग पक्षाने आपली भिस्त, फिर्याद वरील फिर्यादीची सही - **निशाणी क्र.२२** इत्यादी कागदोपत्री पुराव्यावर ठेवली. आरोपींविरुद्ध कोणताही आक्षेपार्ह पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदवण्यात आले नाही.

०६. अभियोग पक्षाचे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती आर. एच. मोरे व आरोपींचे विद्वान विधिज्ञ श्री. जे. ए. जाधव यांचा युक्तिवाद ऐकला.

०७. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून व अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर माझे विवेचनाकरीता खालील मुद्दे उपस्थित झाले. त्या कामी कारणमीमांसेसह निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदवले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक ०६/०५/२०१५ रोजी, मौजे मिणचे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे आरोपी क्र.१ व २ यांनी फिर्यादीची फसवणूक करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या विट भट्टीवर काम करण्यासाठी येण्याचे मान्य करून तसा करार केला व करारापोटी रक्कम रू.१,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) त्यांना देण्यासाठी अप्रामाणिकपणे प्रवृत्त करून फिर्यादीची फसवणूक केली, अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| २. | उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ व २ यांनी फिर्यादीची फसवणूक करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या विट भट्टीवर काम करण्यासाठी येण्याचे मान्य करून तसा करार केला व करारापोटी रक्कम रू.१,५०,०००/- (रूपये एक लाख पन्नास हजार मात्र) त्यांना देण्यासाठी अप्रामाणिकपणे प्रवृत्त करून फिर्यादीच फसवणूक करून फौजदारीपात्र न्यासभंग केल्याचे, अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **नकारार्थी.** |
| ३. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार.** |

## <u>कारणमिमांसा.</u>

### <u>मुद्दा क्र.१ व २ करिता -</u>

०८. मुद्दा क्र.१ व २ हे एकमेकांशी निगडित असल्याने त्यांच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सदर मुद्दे विवेचनाकरिता एकत्रित विचारात घेण्यात आलेले आहेत.

०९. अभियोग पक्षाने तपासलेल्या फिर्यादी साक्षीदार – वसंत शंकर जाधव (अ.सा.क्र.१) यांनी त्यांच्या मौखिक पुराव्यादरम्यान असे नमूद केले आहे की, ते आरोपींना ओळखतात. सन २०१५ मध्ये आरोपी हे वीट भट्टीमध्ये कामाला आले होते. त्यावेळी त्यांनी अनामत रक्कम उचल केली होती. त्याबदल्यात त्यांनी काम पूर्ण केले. त्यानंतर, आरोपींनी फिर्यादीकडून अनामत पोटी रक्कम रू. १,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) स्वीकारून त्यांची फसवणूक केली व ते कामावर आले नाहीत, असे काही घडले नाही. त्यांनी न्यायालयात फिर्याद दाखल केली होती. परंतु, ती गैरसमजुतीतून दाखल केली होती. सदर फिर्यादी साक्षीदारास अभिलेखावरील दिनांक ०६/१२/२०१६ रोजीची तक्रार दाखविण्यात आली असता, त्यावर त्यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र, मजकूराबाबत त्यांना काही माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. फिर्यादी यांची तक्रारीवरील स्वाक्षरी ही

**निशाणी क्र.२२** वर आहे.

१०. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या सदर फिर्यादी साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य करणारी साक्ष दिली नाही. सबब सरकारी वकिलांनी सदर फिर्यादी साक्षीदारास फितुर घोषित करून उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परंतु सदर फिर्यादी साक्षीदाराने आरोपींविरुद्ध कोणतीही आक्षेपार्ह विधाने केली नाहीत. त्यामुळे अभियोग पक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही महत्त्वाची कबुली सरकारी वकील सदर साक्षीदारांच्या तोंडून मिळवू शकले नाहीत. तसेच फिर्यादी व आरोपी यांनी **निशाणी क्र.१९** वर संयुक्त पुरसीस दाखल करून त्यांचे दरम्यान आपसांत तडजोड झाली असल्याचे, फिर्यादीची आरोपींविरुद्ध कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याचे, सदरचा गुन्हा गैरसमजुतीतून दाखल झाल्याचे कथन केल्यामुळे अभियोग पक्षातर्फे इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही.

११. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन करता, दिनांक ०६/०५/२०१५ रोजी, मौजे मिणचे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे आरोपी क्र.१ व २ यांनी फिर्यादीची फसवणूक करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या विट भट्टीवर काम करण्यासाठी येण्याचे मान्य करून तसा करार केला व करारापोटी रक्कम रू.१,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) त्यांना देण्यासाठी अप्रामाणिकपणे प्रवृत्त करून फिर्यादीची फसवणूक केली, व फौजदारीपात्र न्यासभंग केल्याचे, अभियोग पक्षाने निःसंशय सबळ पुराव्यानिशी शाबीत केलेले नाही. त्यामुळे आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहेत. सबब, आरोपी त्याच्यावरील आरोपांमधून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. करिता मी मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.३ चे निष्कर्षाकरिता खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. आरोपी क्रमांक **१. सुभाष नामदेव शिंगे.** व **२. संतोष नामदेव शिंगे.** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४०६ व ४२० सह कलम ३४ मधील गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे बंधपत्र व जामीनकतबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपी क्र.१ व २ यांना असे निर्देशित करण्यात येते की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये या न्यायालयाचे न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील अथवा अर्ज दाखल झाल्यास त्यांच्यासमोर हजर रहाण्याकरिता सहा महिन्यांच्या कालावधीकरिता त्यांनी प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रकमेचा जामीन द्यावा.

( खुल्या न्यायालयात जाहीर व उदघोषित करण्यात आला.)

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2026.07.02 13:23:42 +0530

पेठवडगांव.
दिनांक - ०२/०७/२०२६.

**( श्रीनिवास अ. कुलकर्णी )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ-वडगांव,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.